# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### नांदूर-मधमेश्वर (जि.औरंगाबाद) कालवा लाक्षक्षेत्रात बागायत असलेल्या जमिनधारकांना कोरडवाहूचे निकष लावून दुष्काळाचे अनुदान वाटप केल्याबाबत

**(१) २६४८२ (१२-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूर-मधमेश्वर (जि.औरंगाबाद) कालवा लाक्षक्षेत्रात बागायत असलेल्या जमिनधारकांना कोरडवाहूचे निकष लावून दुष्काळाचे अनुदान वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोरडवाहू व बागायत रक्कमेतील फरकांची रक्कम देण्याची मागणी नांमका लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरडवाहू व बागायत रक्कमेतील फरकांची रक्कम देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(२) २८९८४ (१८-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः मराठवाडा व विदर्भातील दुष्काळी परिस्थितीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी बाहेरगावी असलेल्या मुलाच्या शिक्षणाचा खर्च व मराठवाड्यातील सततच्या अवर्षणामुळे निर्माण झालेल्या भयंकर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या विजेचे बिल शासन भरणार आहे तसेच मागेल त्या शेतकऱ्यांला शेततळे,विहिरी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना विद्युत मोटारी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही तथापि महसुल व वन विभाग दिनांक २० ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सुट

२) कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट

३) शालेय/ महाविद्यालयीन विदयार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.

४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

५) दुष्काळसदृश्य परिस्थती जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गत काही महिन्यात पाऊस पडला नसल्याने राज्यभरात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत**

**(३) २९७२४ (१८-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत काही महिन्यात पाऊस पडला नसल्याने राज्यभरात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुष्काळ सदृश्य परिस्थितीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर दुष्काळ निवारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६)** :(१), (२) व (३) होय.

सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४७०८ गावांत विविध उपाययोजना दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आल्या आहेत.

सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पीक कापणी प्रयोगानंतर हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या एकूण १५७४७ गावांत विविध उपाययोजना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये जाहीर करण्यात आल्या.

राज्यातील सन २०१५-१६ च्या दुष्काळ सदृष्य परिस्थितीच्या अनुषंगाने बाधीत झालेल्या १५७४७ गावांतील खातेदारांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये रुपये ३५७८.४३ कोटी इतका निधी कृषी विषयक मदत म्हणून वाटप करण्यात आला. तर पाणीपुरवठा योजनेकरिता रुपये ३१४.५६ कोटी व जनावरांच्या छावण्यांकरति रुपये १०९.८४ कोटी इतका निधी उपलबध करुन देण्यात आला.

सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या पुणे व नाशिक विभागातील १९९१ गावांत विविध उपाययोजना दिनांक १० मार्च, २०१६ व दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आल्या.

खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागत कापूस पिकासाठी, अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन पिकांसाठी तर नागपूर विभागातील धान पिकांच्या झालेल्या नुकसानीसंदर्भात विशेष मदत दिनांक २ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आली आहे.

दिनांक ४ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ निवारण समिती गठीत करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील सिन्नर तालुक्यातील दुष्काळ संदर्भातील उपाययोजना राबविण्याबाबत**

**(४) २९८७९ (१६-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिन्नर तालुक्यातील निमगाव-सिन्नर, बारागाव प्रिप्री, पाटप्रिंपी, सुळेवाडी, केपा, नगर या गावासंह पूर्व भागात पावसाअभावी खरीपची पिके जळून जात आहे. तसेच शेतीच्या पाण्याबरोबरच शेतक-यांपुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे पशुधन वाचविणे अवघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करुन येथे दुष्काळ संदर्भातील उपाययोजना राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-११-२०१६) :**(१) व (२) अंशतः खरे आहे.

खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस नुकसानीसंदर्भात दिनांक २ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विशेष मदत देण्यात आली आहे.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.५२/म-७ दिनांक १० मार्च, २०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

सिन्नर तालुक्यात दिनांक १६/७/२०१६ अखेर समाधानकारक पाऊस झाल्याने खरीप पिक परिस्थितीत अद्याप नुकसान नाही. तसेच आवश्यक तेथे टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करण्याबाबत**

**(५) २९९५५ (१८-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात तीव्र टंचाई सदृश परिस्थिती निर्माण झाली असून जिल्हयातील पाण्याने तळ गाठले आहे, त्यामुळे जिल्हाभर टंचाई निर्माण झाली असून एका राजकीय पक्षाने नाशिक जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करुन शासनाकडून वेळीच योग्य उपाययोजना करण्यात व्हाव्यात अशी मागणी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील तीव्र टंचाई लक्षात घेता नाशिक जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :**(१) अशंतः खरे आहे.
(२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय २०१५/प्र.क.एससीवाय२०१५ /प्रक्र ३११/म-७ दिनांक २० ऑक्टोबर २०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असुन त्याअनुषंगाने विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता मुख्यमंत्र्यांनी १५ दिवसात शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची केलेली घोषणा**

**(६) ३१५५६ (१५-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता मुख्यमंत्र्यांनी १५ दिवसात शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची घोषणा केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना दुष्काळी मदत देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोना केल्या व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :**१) व २) अशंतः खरे आहे.

महसूल व वन विभाग दिनांक २० ऑक्टोबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगाम पैसेवारी ५० पैशांपेशा कमी असलेल्या गावांमध्ये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमील महसूलात सुट

२) कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट

३) शालेय/ महाविद्यालयीन विदयार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.

४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

५) दुष्काळसदृश्य परिस्थती जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दुष्काळ जाहिर करण्याच्या पध्दतीत बदल करुन नवीन पध्दतीचा अवलंब करण्याबाबत**

**(७) ३२९३७ (१६-०१-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळ जाहिर करण्याच्या पध्दतीत बदल करुन केंद्र शासनाच्या निकषानुसार २, ३ महिने आधीच दुष्काळ जाहिर करण्याची नवीन पध्दती अवलंब करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन पध्दतीची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत अंतिम आणेवारी व दुष्काळग्रस्तांना मदत करण्यास होणारा विलंब कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६)** :(१) व (२) अशंत: खरे आहे.
राज्यात दुष्काळ जाहिर करण्यासाठी Drought Manual २००९ मधील निकष व पिक पैसेवारी हा एक प्रमुख निकष ग्राहय धरून दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजी सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात जनावरांच्या चाऱ्याचे दर वाढल्याबाबत**

**(८) ३३४१७ (१६-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयात जनावरांच्या चाऱ्याचे दर वाढल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळी परिस्थिती पहाता चाऱ्याचे दर स्थिर ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६)** :(१) अशंत: खरे आहे.
(२) शासन पत्र एससीवाय -२०१६ /प्र.क्र.१७८/म-७ दिनांक ५ एप्रिल २०१६ नुसार अहमदनगर जिल्हयात आवश्यक असेत त्या ठिकाणी चारा छावण्या सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद अहमदनगर मार्फत नाविन्यपुर्ण योजना हिरवाचारा उत्पादन प्रकल्प राबविणे यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिंपरी, जैनापूर, निमशिरगांव, कोंडिग्रे ,तमदलगे, धरणगुत्ती व हरोली (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) या गावातील पिक आणेवारीबाबत**

**(९) ३५२५९ (१३-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंपरी, जैनापूर, निमशिरगांव, कोंडिग्रे ,तमदलगे, धरणगुत्ती व हरोली (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) या गावातील पिक आणेवारीबाबत तेथील ग्रामस्थांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास तहसिलदार, शिरोळ यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :**(१) व (२) होय ह खरे आहे. दिनांक १९/१०/२०१५ रोजी दिलेल्या निवेदनामध्ये सदर सात गावांची आणेवारी ही ५० पैसे जास्त दाखवलेली आहे. ती ५० पैसेच्या आत नोंदविण्याबाबत विनंती केली होती. याबाबत मंडळ अधिकारी यांच्या अहवालानुसार पिक कापणी प्रयोगानुसार पिक पैसेवारी ५० पैसे पैक्षा कमी दाखवता येणार नाही. त्यानुसार सदर अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरी (जि.गोंदिया) तालुक्यात धानाचे उत्पन्न पावसाअभावी न झाल्याबाबत**

**(१०) ३५३७९ (१६-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, देवरी, सालेकसा या तालुक्यातील शेतकऱ्यांनी यावर्षी धानाची पेरणी केली असून यापैकी देवरी तालुक्यात पाऊस न झाल्यामुळे या ठिकाणी कोणतेही धानाचे उत्पन्न झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच सालेकसा व आमगाव तालुक्यात धानाची पेरणी केली असताना धानाला किड लागल्यामुळे येथे सुध्दा धानाचे उत्पन्न झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तिन्ही जिल्ह्यांत १०० टक्के दुष्काळ घोषित करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू तिन्ही जिल्हा १०० टक्के दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-११-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१६ प्र.क्र.३११/म-७, दि.२३ मार्च, २०१६ अन्वये अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या देवरी तालुक्यातील ६८ गावे, आमगाव तालुक्यातील ५ गावे, सालेकसा तालुक्यातील १३ गावे व गोरेगाव तालुक्यातील २३ गावे अशी एकूण १०९ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून जाहीर करणेबाबत.**

**(११) ३५४४३ (१८-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयामध्ये सरासरीच्या केवळ ५२ टक्के पाऊस झाल्याने जिल्हयात सर्वत्र पिण्याचे पाणी,जनावरांचा चारा यासह पाण्याविना शेतीवर आलेले संकट तसेच शासन दरबारी सोलापूर जिल्हयाची रब्बीचा जिल्हा म्हणून नोंद असल्याने, तसेच चुकीच्या पध्दतीने आणेवारी लावल्यामुळे सोलापूर जिल्हयाचा समावेश शासनाच्या दुष्काळग्रस्त यादीमध्ये झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) त्याअनुषंगाने, सोलापूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासंदर्भात पालकमंत्री व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.महसुलमंत्री यांच्याकडे दुष्काळग्रस्त जिल्हा जाहीर करावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सोलापूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :**(१) व (२) अशंत: खरे आहे.

तथापि महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र एससीवाय -२०१६/प्र.क्र.५२/म-७ दिनांक १० मार्च २०१६ व शासन निर्णय क्र.एससीवाय २०१६/प्र.क्र.२१९/म-७ दिनांक २७ एप्रिल २०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील अंतीम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये दुष्काळ जाहीर करून त्यानुषंगाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत.

सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने रब्बी जिल्हा असल्याने खरीप पिकांची पैसेवारी जाहीर केली जात नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) येथे चारा छावण्या सुरु करण्याबाबत**

**(१२) ३५७४४ (१३-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) येथे अत्यल्प पाउस झाल्याने दुष्काळी परिस्थिती असून शेतकरी बांधवांना पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा गरजा पूर्ण करणे अशक्यप्राय झाल्याने, शेतकरी बांधवांकडून मोठ्याप्रमाणात पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची मागणी होत असल्याने, सिन्नर (जि.नाशिक) येथे चारा छावण्या सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधिनी दि. ०१/०९/२०१५ रोजी वा त्या सुमारास मा. पशुसंवर्धन मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्‌वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सिन्नर तालुक्यात सप्टेंबर, २०१५ व ऑक्टोबर, २०१५ मध्ये पर्जन्यमान होऊन चा-याची उपलब्धता झाली होती. त्यानुसार पशुधन विकास अधिकार, सिन्नर, तालुका कृषी अधिकारी, सिन्नर व गट विकास अधिकारी, सिन्नर यांचेकडील अहवालानुसार माहे जून, २०१६ पर्यंत पुरेल इतक्या चा-याची उपलब्धता असल्याने चारा छावण्या सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात आली नाही. टंचाई सदृश्य गावात मागणीनुसार व आवश्यतेनुसार टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवाना पेन्शन मिळण्याबाबत

**(१३) ३६३०० (१८-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना पेन्शन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आला,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गाव, तालुका पातळीवर दुष्काळ निवारण समित्या नेमण्याचा घेण्यात आलेला निर्णय

**(१४) ३९९२१ (२०-०४-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राहुल जगताप**

**(श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गाव,तालुका व जिल्हा पातळीवर दुष्काळ निवारण समित्या स्थापण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समित्यांमध्ये किती जणांचा समावेश करण्यात येणार आहे व त्याची नावे काय आहेत व त्याच्याकडे कोणती कामे सोपविण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, या समिती किती कालावधीत स्थापन करण्यात येणार आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-१०-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

(२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.३८६/म-७ दिनांक ४ जानेवारी, २०१६ अन्वये ग्राम पातळीवर, तालुका पातळीवर, व जिल्हा पातळीवरील दुष्काळ निवारण समितीची रचना करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजा ढिवरवाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील पुनर्वसित लोकांना भूखंडाचे पट्टे मिळाले नसल्याबाबत

**(१५) ४७७२३ (२४-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा ढिवरवाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील पुनर्वसित लोकांना भुखडाचे पट्टे मिळाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक गावकऱ्यांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुनर्वसित लोकांना भुखंडाचे पट्टे देण्याची मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६)** :(१) अशंत: खरे आहे.
(२) होय. ग्रामपंचायत ढिवरवाडा यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे.
(३) होय.
(४) व (५) पुनर्वसीत लोकांना उपलब्ध रेकार्डनुसार एकूण ३९४ भुखंडापैकी १२१ भुखंडाचे पटटे वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरित लोकांची सविस्तर चौकशी करण्यात येवून लवकरात लवकर पटटे वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

---

**आदिवासी, बौध्द व कोलाम शेतक-यांना वाटप करण्यात आलेल्या बैलबंडी खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(१६) ४९३६२ (३०-०४-२०१६). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद, चंद्रपुर येथे समाजकल्याण व कृषी विभागाच्या विशेष घटक योजनेंतर्गत जिल्हयातील आदिवासी, बौध्द व कोलाम शेतकरी बांधवाना बैलबंडीचे वाटप करण्यासाठी २००० बंड्यांची खरेदी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १००० रुपये प्रती बैलबंडी किंमत असलेल्या या बैलबंडीचे वजन नियोजीत वजनापेक्षा तब्बल २५ किलोग्राम ने कमी भरल्याचे जिल्हा परिषद सदस्यांकडून निदर्शनास आणून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खरेदीतील बैलबंडी अंदाजपत्रकीय वजनापेक्षा कमी भरल्याने खरेदी व्यवहारात गैरव्यवहार झाले असल्याने उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केलेली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६)** :(१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कृषि विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपुर मार्फत विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत) व आदिवासी उपयोजना (क्षेत्राबाहेरील) अंतर्गत १४७१ लोखंडी बैलगाडयांची खरेदी करण्यात आली होती.
(२) बैलबंडीची किंमत रू.१६०००/- एवढी होती. पुरवठा करण्यात आलेल्या बैलगाडयांचे वजन कमी असल्याची तक्रार जिल्हा परिषद सदस्यांनी केली होती.
(३) व (४) सदोष बैलगाडयांचा पुरवठा करणाऱ्या मे.बालाजी अॅन्ड कंपनी, गोंदिया, स्टार एन्टरप्रायझेस, पुणे व अनुराग एन्टरप्रायझेस, वाशिम यांना काळया यादीत टाकण्याचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच क्वॉलिटी कंट्रोलच्या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा दाखविला आहे, त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कायदेशीर कार्यवाही करण्याकरिता चंद्रपूर जिल्हा न्यायालयाच्य वकीलांचा सल्ला मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बेबंळा प्रकल्पा अंतर्गत डेहणी उपसा सिचंन योजनेच्या ठिबक संच अनुदान कृषी खात्याने परत मागितल्याबाबत**

**(१७) ४९६०१ (०४-०५-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेबंळा प्रकल्पा अंतर्गत डेहणी उपसा सिचंन योजने करीता ठिबक संच बसविण्याकरीता कृषी खात्याव्दारे देण्यात आलेले अनुदान कृषी खात्याने परत मागितले असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास अनुदान परत गेल्यामुळे ठिबक संच बसविण्यास शेतक-यांना येणा-या अडचणी करीता जबाबदार असणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) योजनेवर ठिबंक संच बसविण्यास ९० टक्के देण्यात येणारे अनुदान प्राप्त न झाल्यामुळे योजना पुर्ण न होण्यास अजुनही विलंब लागणार असल्यामुळे शासनाने विशेष बाब म्हणुन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) बेंबळा प्रकल्पांतर्गत डेहणी उपसा सिंचन योजनेकरिता ठिबक संच बसविण्याकरिता कृषी विभागाकडून रू.७.३२ कोटी इतका निधी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना दिनांक २६.०२.२०१५ रोजी उपलब्ध करून देण्यात आला होता. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून सदर निधी सन २०१४-१५ या वर्षात खर्च होणे अपेक्षित होते. तथापि, नोव्हेंबर, २०१५ अखेरपर्यंत फक्त रू. १.४४ कोटी एवढा खर्च झाला होता. यास्तव अखर्चित निधी रू. ५.८८ कोटी दिनांक २१.१२.२०१५ रोजी परत घेण्यात आला. परंतु दिनांक ०६.०१.२०१६ रोजी सदर निधी पुन्हा, कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना परत करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयासह राज्यात दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांकडून चाराछावणीची मागणी होत असल्याबाबत**

**(१८) ५३२३० (२८-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयासह राज्यात दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी चाराछावणीची मागणी केल्यानंतर त्यास परवानगी देण्यासाठी १ ते २ महिन्याचा कालावधी लागत असल्याने

जनावरांची उपासमार होत असल्याची बाब माहे मार्च, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी चाराछावणीची मागणी केल्यानंतर ७ दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या राहत्याघरापासून ३ ते ५ किलोमीटर अंतरावर चारा छावण्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१५ प्र.क्र.२४८/म-७, दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ मधील अटींच्या अधीन राहून बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात जनावरांच्या छावण्या उघडण्यात परवानगी देण्यात आली होती. तसेच सांगली, जिल्हयात दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजीच्या पत्रान्वये, परभणी जिल्हयात दिनांक १२ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये व अहमदनगर जिल्हयात ५ एप्रिल, २०१६ नुसार चारा छावणी सुरु करणेबाबत परवानगी देण्यात आली होती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी मंडळ यांची तातडीने नियुक्ती करण्याबाबत**

**(१९) ५३२७८ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ अस्तित्वात नसल्याची, तसेच या महामंडळाला पूर्णवेळ व्यवस्थापकीय संचालक नसल्याची बाब माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाच्या सदरहू रिक्त पदांवर तातडीने नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६)** :(१) नाही.
(२) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळावर सामान्य प्रशासन विभाग शासन आदेश क्रमांक सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रतिनि-२०१६/सं.क.६०३/प्र.क.१२०/१६ चौदा दि. २९.७.२०१६ अन्वये श्री सु ना रणखांबे सहसचिव यांची व्यवस्थापकीय संचालक या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अध्यक्ष व कार्यकारी मंडळाची देंखील नियुक्ती शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्रातील २९ हजार ६०० गावांमध्ये दुष्काळ अधिकृतरित्या जाहिर केल्याबाबत

**(२०) ५३६४५ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील २९ हजार ६०० गावांमध्ये दुष्काळ अधिकृतरित्या राज्य शासनाने नुकताच माहे मे,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्तांसाठी शासनाने कोणकोणत्या सवलती जाहीर केल्या आहेत व त्याची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-११-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभाग दिनांक २७ एप्रिल, २०१६, २३ मार्च, १६ च्या खरीप व रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये खालील सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलता सुट.

२) कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट.

३) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.

४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.

५) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

६) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.

७) सहकारी पिक कर्जाचे पुनर्गठन.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परराज्यातून आणलेले गोमास बाळगणे हा गुन्हा नसल्याचे, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत

**(२१) ५३७२८ (१२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाने, गोवंश हत्या बंदीचा अधिनियम वैध ठरवितांना परराज्यातून आणलेले गोमास बाळगणे हा गुन्हा नसल्याचे, स्पष्ट करत सदर अधिनियमातील कलम ५ (ड) व कलम ९ (ब) या दोन्ही तरतूदी दिनांक.०६ मे २०१६ रोजी रदद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य घटनेतील ४८ सा व्या कलमातील तरतूदीनुसार गोहत्या बंदी वैध ठरत असल्याने, गोमास परराज्यातून आणणे व बाळगणे ही असलेली तरतूद मा.उच्च न्यायालयाने रदद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अशाच प्रकारचा अधिनियम उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात राज्यात असून, त्याच धर्तीवर राज्य शासनाने अधिनियमात तरतूद करुन, कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०४-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

यासंदर्भात मा.उच्च न्यायलय, मुंबई येथे अनेक याचिका दाखल झाल्या होत्या. सदरहू याचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि. ६ मे, २०१६ रोजी एकत्रित निर्णय दिला असून, त्यामध्ये उक्त अधिनियमातील कलम ५ ड आणि कलम ९ ब मधील तरतूदी अवैध ठरविल्या आहेत.

(२) या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि. ०६ मे, २०१६ रोजी दिलेल्या आदेशामध्ये भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ मधील मूलभूत अधिकारांचे उल्लघंन होत असल्यामुळे नमूद करुन कलम ५ ड आणि कलम ९ ब मधील तरतूदी रद्द केल्या आहेत.

(३) व (४) या संदर्भात मा.उच्च न्यायालाने दि. ६.५.२०१६ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विविध विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनातर्फे देखील विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात येत आहे. सदर बाब सध्या मा.सर्वोच्च न्यायालयासमोर न्यायप्रविष्ट आहे.

---

### राज्यात, अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या २४७२ संख्या अल्पसंख्यांक विद्यार्थी मिळत नसल्याचे सांगून, अन्य समाजातील विद्यार्थ्यांना देणग्या घेवून प्रवेशांमध्ये केलेली अनियमितता

**(२२) ५३७८५ (२०-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या २४७२ संख्या अल्पसंख्यांक विद्यार्थी मिळत नसल्याचे खोटे कारण सांगून, अन्य समाजातील विद्यार्थ्यांना देणग्या घेवून त्यांना प्रवेश देवून, अनियमितता करण्याचे प्रकार वाढत असताना राज्य शासनाने आणखी २५७३ संस्थांचे अल्पसंख्यांक दर्जा बाबतच्या प्रस्तावास दि.०३.०५.२०१६ रोजी वा त्या सुमारास मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने आधीच अस्तित्वात असलेल्या संस्थांना अल्पसंख्यांक समाजातील पुरेसे विद्यार्थी मिळत नसल्याने, आणखी २५७३ संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीकरुन ५१ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या अटींचे उल्लंघन केल्याबाबत शासनाने ७९ संस्थांना, नोटीस दिली असताना प्राप्त प्रस्तावाचे शासनाने छाननीची कार्यवाही पूर्ण करुन सदरहू संस्थेची मान्यता रदद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यता येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) दि.३/५/२०१६ पर्यंत राज्यातील सुमारे २५८० इतक्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ या केंद्र शासनाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार विहित करण्यात आलेल्या दि. २७.५.२०१३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती ज्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था पूर्ण करतात त्यांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. जर एखादया अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस पुरेशे अल्पसंख्याक विदयार्थी मिळत नसतील तर इतर अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र नाकारता येणार नाही. या अधिनियमानुसार विहित निकष अटी व शर्ती पूर्ण करणा-या अल्पसंख्याक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देणे क्रमप्राप्त आहे. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थानी त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जाप्रमाणे त्यांना प्रवेश देणे आवश्यक आहे. तथापि अल्पसंख्याक विद्यार्थी मिळत नसल्यास बिगर अल्पसंख्याक विद्यर्थांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची तरतुद आहे.
(३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना अल्प प्रमाणात प्रवेश दिल्याच्या कारणास्तव दक्षिण मुंबईतील ११ शाळा व राज्यातील १४ महाविद्यालयांना नोटिस देण्यात आल्या होत्या. सदर नोटिसनुसार या अल्पसंख्याक संस्थेची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीमध्ये अल्पसंख्याक संस्थांनी दिलेली कारणे व अधिनियमातील तरतूद, तसेच दि.२७.०५.२०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवून सदर नोटिस रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था, कोचिन तर्फे राज्य मत्स्य विभागाच्या सहकार्याने सिंधुदुर्ग किनारपट्टीवर १ फेब्रुवारी, २०१६ पासून मच्छिमारांची जनगणना करण्याबाबत**

**(२३) ५४१२८ (१२-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था, कोचिन तर्फे राज्य मत्स्य विभागाच्या सहकार्याने सिंधुदुर्ग किनारपट्टीवर १ फेब्रुवारी, २०१६ पासून मच्छिमारांची जनगणना करण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, किती मच्छिमारांची जनगननेत नोंद झाली आहे, यामध्ये पिढीजात मासेमारी करणारे किती मच्छिमार नोंदविण्यात आले आहेत,

(३) सदर मच्छिमार कोळी बांधवांना मच्छिमारीसाठी परप्रांतिय मच्छिमारांच्या ट्रॉलरकडून होणारा त्रास रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-१०-२०१६) :**(१) होय.

(२) एकत्रित करण्यात आलेल्या जनगणनेच्या माहितीचे विश्लेषण आणि संकलन प्रक्रिया केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था, कोचिन येथे सुरू आहे.

(३) परराज्यातून होणाऱ्या अवैध मच्छिमारीस आळा घालण्यासाठी विभागामार्फत ५ गस्ती नौका नेमण्यात आल्या आहेत. त्याअन्वये ७ सागरी जिल्हयातील अवैध मासेमारीस आळा घालण्यासाठी विभागामार्फत नेमण्यात आल्या असून अवैध मासेमारी अथवा परराज्यातून होणारी अवैध मासेमारी आढळल्यास सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ नुसार कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालाश आणि स्फुरदयुक्त खतांच्या अनुदानात केलेली कपात**

**(२४) ५४३२६ (२०-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालाश आणि स्फुरदयुक्त खतांच्या अनुदानात शासनाने कपात केल्यामुळे येणाऱ्या खरीप हंगामात या दरवाढीची झळ सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव द्यावा या शेतकरी वर्गाकडून वारंवार होत असलेल्या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही  खरे आहे काय,

(३) असल्यास, खतांच्या समस्येवरून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असून अनुदान कपातीमुळे कृत्रिम टंचाई निर्माण होऊन त्याची झळ शेतकऱ्यांना बसू नये आणि अनुदानात देखील कपात होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, किमान आधरभूत किमंती जाहिर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. राज्य शासन शेतक-यांना वाजवी हमीभाव मिळावेत म्हणून केंद्र शासनाकडे आग्रहि भूमिका घेत असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विस्थापित सिंधी समाजाच्या विविध वसाहतीतील नागरिकांचे पुनर्वसन करणेबाबत**

**(२५) ५४८३३ (२२-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात ठाणे, कोपरी कॉलनी, धुळे, पिंपरी, उल्हासनगर येथील विस्थापित सिंधी समाजास न्यायालयीन आदेशानुसार त्यांच्या जागी कायम करणे व पुनर्वसन करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.०५/०३/२०१५ रोजी वा त्यासुमारास मा. महसूल मंत्री महोदयांना पत्र लिहून विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिस्प्लेस्ड पर्सन कायद्यानुसार नियामानुकुल न झालेली, नियामानुकुल करण्याची प्रक्रिया तो कायदा रद्द झाल्याने अर्धवट राहिल्यामुळे प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांची शासनस्तरावर हवी तशी दाखल घेतली जात नसल्याचेही उपरोक्त पत्रात नमूद आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१६) :**(१) व (२) लोकप्रनिनिधींचे निवेदन आढळून आले नाही. तथापि, निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने केलेले कायदे निरसित झाल्याच्या दिनांकास संबधित प्राधिका-यांपुढे प्रलिंबत असलेल्या प्रकरणंमध्ये निर्णय घेवून त्याची अमलबजावणी करण्याचे निर्देश सिव्हील अपिल क्र ६०७९/२०१० (विशेष अनुज्ञा याचिका क्र ६७०३/२००८) प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि २८/४/२०१४ रोजी दिले आहेत. या निर्देशाच्या अनुषंगाने सर्व संबधित प्राधिका-यांना कार्यवाही करण्याच्या सुचना शासन स्तरावरून दि १७/९/२०१४ , दि. ३/६/२०१५ व दि २३/३/२०१६ रोजी दिल्या आहेत. यास्तव मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची शासन स्तरावर दखल घेतली जात नाही. हे म्हणणे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्रशासनाने डाळी, कापूस, भात, कडधान्ये व तेलबिया यांच्या सन २०१६-१७ सालासाठी ठरविलेल्या किमान आधारभूत किमतीबाबत**

**(२६) ५५२२१ (२२-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०१६-१७ च्या खरीप हंगामासाठी १ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास डाळी, कापूस, भात, कडधान्ये व तेलबिया यांच्या बोनस व किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक पिकांसाठी किती किमान आधारभूत किंमती व बोनस जाहीर केला आहे काय,

(३) असल्यास,महाराष्ट्र शासनाने वरील शेती मालाच्या आधारभूत किंमतीसाठी केंद्र शासनाकडे किती रकमेची शिफारस केली आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) केंद्र शासनाने दि.३ जून, २०१६ रोजी कापूस, धान, कडधान्ये व तेलबिया यासाठी किमान आधारभूत किंमती जाहिर केल्या आहेत. केंद्र शासन डाळी करिता किमान आधारभूत किंमत जाहिर करत नाही.

(२) केंद्र शासनाने खरीप विक्री हंगाम २०१६-१७ साठी खालील प्रमाणे किमान आधारभूत किंमत व बोनस जाहीर केलेली आहे.

रूपये प्रति क्विंटल

| पीक | किमान आधारभूत किंमत | बोनस |
|---|---|---|
| धान (प्रत-सर्वसाधारण) | १४७० | ० |
| ज्वारी | १६२५ | ० |
| बाजरी | १३३० | ० |
| मका | १३६५ | ० |
| तूर | ४६२५ | ४२५ |
| मूग | ४८०० | ४२५ |
| उडीद | ४५७५ | ४२५ |
| भुईमूग | ४१२० | १०० |
| सोयाबीन (पिवळा) | २६७५ | १०० |
| कापूस-लांब धागा | ४१६० | ० |

(३) खरीप विक्री हंगाम २०१६-१७ साठी राज्य शासनाने केंद्रीय कृषी मुल्य व किंमत आयोगाकडे खालीलप्रमाणे किंमती प्रस्तावित केल्या होत्या.

रूपये प्रति क्विंटल

| | |
|---|---|
| धान (प्रत-सर्वसाधारण) | ३०५३ |
| ज्वारी | २६०६ |
| बाजरी | ३०१५ |
| मका | १८११ |
| तूर | ५४३४ |
| मूग | ९३२१ |
| उडीद | ७७७४ |
| भुईमूग | ७८०७ |

| | |
|---|---|
| सोयाबीन (पिवळा) | ४५९९ |
| कापूस-लांब धागा | ७४८५ |

---

**पांगरा ढोणे (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील शेतकऱ्यांनी बियाणांसाठी कोरडया विहिरीत उपोषण सुरू केल्याबाबत**

**(२७) ५५२४२ (२०-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांगरा ढोणे (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील ७ शेतकऱ्यांनी बियाणे व खते मिळण्यासाठी २५ फुट कोरडया विहिरीत दिनांक २२ मे २०१६ पासून बेमुदत उपोषणास सुरूवात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात बियाणे व खते पुरविण्यात यावीत अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पांगरा ढोणे (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील शेतक-यांना अनुदानाच्या स्वरूपात बियाणे व खते मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-१०-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) पांगरा ढोण जि.परभणी येथील थकबाकीदार शेतक-यांना कापूस बियाण्याचे मोफत वाटप करण्यात आले आहे. तसेच या गावातील खरीप २०१५ मधील दुष्काळ बाधित झालेल्या ६३४ शेतक-यांना रक्कम रू २८,७१.५२०/- रोख स्वरूपात मदत देण्यात आलेली आहे तर पिक विमा योजनेअंतर्गत रू.३८,२०.५२८/- इतकी मदत देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्हयात खरीपाच्या हंगामात पेरणीसाठी बैल विकत घेण्याबाबत**

**(२८) ५५४३९ (१२-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात खरीपाच्या हंगामात पेरणीसाठी बैलांची नितांत गरज असतांना बैल विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे आर्थिक क्षमता नसल्यामुळे गरजवंत शेतकरी बैलांची खरेदी करु शकत नसल्याने बाजारात गुराचे भाव दुप्पट झाले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २ वर्षापासून हवामानाच्या अनियमितपणे नापिकी होत असल्यामुळे शेतकरी वर्ग अर्थिक संकटात सापडल्याने विक्रीस काढलेल्या जनावरांना योग्य तो भाव मिळत नसल्याने पशुपालक हवालदिल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने जनावरे विक्रीबाबत योग्य तो भाव मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-१०-२०१६) :**(१) व (२) अंशतः खरे आहे. अकोला जिल्हयातील बैलांच्या खरेदी किंमतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे तेथे पुढीलप्रमाणे बाजारभाव होते.

| महिना | किमान दर | कमाल दर |
|---|---|---|
| एप्रिल-२०१६ | २०,०००/- | ३५,०००/- |
| मे-२०१६ | १४,५००/- | ३०,०००/- |
| जून-२०१६ | १५,०००/- | ३०,०००/- |

वर नमूद आकडेवारी पहाता बैलांच्या खरेदी किंमतीत फार मोठी तफावत दिसून येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे जिल्हा प्रशासनाने दुष्काळग्रस्तांना तात्काळ मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती कक्षात वाररुम स्थापन करण्याबाबत

**(२९) ५५९२६ (२२-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हा प्रशासनाने दुष्काळग्रस्तांना तात्काळ मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती कक्षात वाररुम स्थापन करण्याची घोषणा केली होती परंतु पुढे कोणतीच कार्यवाही झाली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वार रुम अद्यापही कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घोषणेची अंमलबजावणी तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये वाररुमची स्थापना करण्यात आलेली असून आपत्ती व्यवस्थापन अधिकार यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या लाखो एकर जमिनीचे झालेले हस्तांतरण बेकायदा ठरवून जमिनी परत बोर्डाच्या ताब्यात देण्याबाबत**

**(३०) ५६१२१ (२०-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या लाखो एकर जमिनीचे झालेले हस्तांतरण बेकायदा ठरवण्यात आले आहे या जमिनी परत बोर्डाच्या ताब्यात घेण्यासाठी राज्य सरकारने सरकारी आदेश जारी केल्याचे माहे मे- २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेरड रोडवरील उद्योगपती मुकेश अंबानी यांचे अलिशान ॲटिलिया निवासस्थान, औरंगाबाद येथील डी मार्ट, एक पंचातारांकित हॉटेल, सिडको, म्हाडा या शासकीय संस्थांकडील जमिनी तसेच अन्य खाजगी व्यक्ती आणि संस्थांनी विकत घेतलेल्या जमिनीची मालकी वक्फ बोर्डाकडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१६) :**(१) अशंत: खरे आहे राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या लाखो एकर जमिनीचे झालेले हस्तांतरण बेकायदा ठरविण्यात आले हे विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही.

तथापि, वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्याच्या व इतर गैरकृती बेकायदेशीर कारवाया रदद करून संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत. सदर कामी वक्फ मंडळाला सहाय्य करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्राखाली १ उपजिल्हाधिकारी २ तहसिलदार २ नायब तहसिलदार संवर्गातील अधिका-याच्या समावेश असलेल्या एका कृती दलाची तीन वर्षाची कालावधीकरीता नियूक्ती करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरु आहे सदयस्थितीत कृतीदलासाठी शासन निर्णय दिनांक १६.५.२०१६ अन्वये पदनिर्मिती करण्यात आलेली असून सदर कृतीदलाकरीता अधिकारी उपलब्ध करून देण्याची महसूल व वन विभागाची विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्ताच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उता-यावर तसेच नागरी भागातील वक्फ मिळकतींच्या अधिकार अभिलेख्यांवर केवळ संबंधित वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे आणि इतर हक्क सदरी "वक्फ प्रतिबंधित सत्त, प्रकार" अशी नोंद घेण्याबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग दि १३.४.२०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न भाग २ मध्ये उल्लेखित ॲटिलिया प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. तसेच औरगांबाद येथील डी मार्ट, एक पंचतारांकित हॉटेल संदर्भात वक्फ मंडळाने सिडको प्रशासन

आणि अध्यक्ष/ सचिव मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटीला नोटीस देवून सुनावणीसाठी बोलाविले असून सुनावणीची कार्यवाही सुरु असल्याचा वक्फ मंडळाने अहवाल सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील आंधळगांव मंडळमधील ग्रामकिसान सभा अभियानामध्ये शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिली नसल्याबाबत**

**(३१) ५६१४० (२०-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील आंधळगांव मंडळमधील ग्रामकिसान सभा अभियानामध्ये शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देणे बंधनकारक होते परंतु तसे न करता काही गावांना कृषी सहाय्यकांनी पूर्वसूचना न देता थेट गावात येऊन गावात सापडतील तेवढया लोकांना सोबत घेऊन फोटो काढले व कोणतीही माहिती न देता निघून गेल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त किसानसभेत कृषी सहाय्यकांना संबंधित सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनाही पूर्वसूचना दिल्या नव्हत्या तरी याबाबत शासनाने त्वरीत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही, ग्राम किसानसभेबाबत कृषि सहाय्यकांनी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना समक्षात व भ्रमणध्वनीद्वारे किसान सभेबाबत पुर्वसुचना दिली होती. तसेच कृषि वार्ताफलकावर सुचना लावण्यात आली होती. कृषि पर्यवेक्षक आंधळगाव १ व कृषि पर्यवेक्षक आंधळगाव २ यंनी तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा यांना प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या खुलाशानुसार संबंधित कृषि सहाय्यकांनी कृषि विभागाच्या सर्व योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली आहे.
(२) याबाबत कृषि सहाय्यकांनी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना किसान सभेबाबत पुर्वसूचना दिली होती. त्यामुळे कार्यवाही करणेबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विकासापासून वंचित राहिलेल्या मुस्लीम समाजाला आरक्षण मिळण्याबाबत**

**(३२) ५६१६६ (२०-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विकासापासून वंचित राहिलेल्या मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे याकरीता लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी सामाजिक संघटनांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच मुस्लीम समाजाच्या मागण्या सोडविण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे ही मागणी प्रामुख्याने करण्यात आली आहे.

(३) सामान्य प्रशासन विभाग दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते.

याबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दि. १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला आहे व सदर अध्यादेशाद्वारे दिलले शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. परंतु शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दि. २३ डिसेंबर, २०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सदर अध्यादेश व्यपगत झाला आहे.

सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतीम निर्णयासाठी प्रलंबित आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या अंतीम निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय शास्वत शेती अभियाना अंतर्गत सेंद्रिय शेती योजनेच्या अमंलबजावणीबाबत**

**(३३) ५६४१२ (२०-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शास्वत शेती अभियाना अंतर्गत सेंद्रिय शेतीची योजना (परंपरागत कृषी विकास योजना) निधीअभावी सन २०१५/१६ मध्ये वर्षभर बंद होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी माहे फेब्रुवारी, २०१६ अखरे केवळ ६६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सेंद्रिय शेती योजनेच्या आराखड्याला शासन स्तरावर मंजुरी मिळण्यास उशीर झाल्याने या योजनेची वर्षभर अमंलबजावणी करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सेंद्रिय शेती योजनेच्या अमंलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खरीप हंगामाच्या प्रमुख पिकांचे उत्पादन निम्म्यावर आल्याबाबत**

**(३४) ५६८३३ (२०-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खरीप हंगामाच्या माहे मे, २०१६ मध्ये झालेल्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालात प्रमुख पिकांचे उत्पादन पाच वर्षाच्या तुलनेत निम्म्यावर आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या प्रमुख बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
दि.२८/४/२०१६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक, २०१६ च्या पुस्तिकेत मागील वर्षाच्या तुलनेत (तृतीय पुर्वानुमान अहवालानुसार) खरीप हंगामात तृणधान्य (२१ टक्के), खरीप तेलबिया (५ टक्के), ऊस (१९ टक्के), तर रब्बी हंगामात तृणधान्य (४१ टक्के), कडधान्य (३० टक्के) व गळीतधान्य (५६ टक्के) घट असल्याचे नमूद केले आहे. मात्र, मागील ५ वर्षातील घटीबाबतचा तपशील पुस्तिकेस देण्यात आलेला नाही.
(२) राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक, २०१६ च्या पुस्तिकेत सन २०१५ मधील बैठकीत उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल सन २०१५-१६ मधील पर्जन्यमान व पीक परिस्थिती, सन २०१६-१७ साठीचे क्षेत्र, उत्पादनाचे लक्षांक, कृषि विभागाच्या प्रमुख योजनांचा सन २०१५-१६ चा आढावा व सन २०१६-१७ चा प्रस्तावित कार्यक्रम याची माहिती तसेच कृषि संलग्न विभागाची माहिती देण्यात आली आहे.
(३) कृषि विभागामार्फत सुधारित बियाण्याचा वापर, तंत्रज्ञान प्रसार, सुक्ष्म सिंचन पध्दतीच्या अवलंबास प्रोत्साहन, जमिन आरोग्य, मृद आणि जलसंधारण कार्यक्रम, फळबाग लागवड, नियंत्रित शेती इ. कार्यक्रमांच्या माध्यमातून तसेच “शेतकरी” या मासिकच्या माध्यमातून पिकांच्या उत्पादन वाढविण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने वक्फ बोर्ड इनाम जमिनीवरील शेतकऱ्यांच्या नावे ७/१२ पत्रकी असलेल्या शेतकऱ्यांची नावे कमी करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(३५) ५७१९८ (२८-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वक्फ बोर्ड इनाम जमिनीवरील शेतकऱ्यांच्या नावे ७/१२ पत्रकी असलेल्या शेतकऱ्यांची नावे कमी करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात दिनांक १८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सदरहू निर्णय रद्द न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदरहू निर्णय रद्द करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद येथील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी श्री ए टी ए के शेख सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश हा एक सदस्यीय चौकशी आयोग गठीत करण्यात आला होता सदर चौकशी आयोगाने वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदींचा विचार करता वक्फ मालमत्तांच्या गाव नमुना नं ७/ १२ उता-यामधील इतर हक्क मालमत्तांच्या गाव नमुना नं /१२ उता-यामधील इतर हक्क सदरी प्रतिबंधित सत्ता अधिकारी वक्फ मालमत्त्यांच्या अधिकार अभिलेखात कब्जेदार रकान्यात खाजगी नावांची नोंद करतात असे निरिक्षण नोंदविले होते या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक ९/४/२०१५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे निहित केलेल्या सर्व प्रकारच्या वक्फ मालमत्तांच्या संदर्भात गा.न.नं.७/१२ च्या उता-यावर भोगवटादार सदरी फक्त संबंधित वक्फ संस्थेच्या नावांची नोंद असावी व त्याशिवाय अन्य कोणाच्या नावंच्या नोंदी असू नयेत त्याप्रमाणे वक्फ मालमत्तांच्या इतर हक्काच्या रकान्यात देखील केवळ 'वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार' अशी नोंद घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सदर निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कृषी शाश्वत विकासासाठी अनुक्रमे खरीप व रब्बी हंगामाकरिता विविध कल्याणकारी योजनांकरिता आर्थिक तरतूद करण्याबाबत**

**(३६) ५७२९३ (२०-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी शाश्वत विकासासाठी अनुक्रमे खरीप व रब्बी हंगामाकरिता विविध कल्याणकारी योजनांकरिता भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबतची मागणी समाजसेवकांनी कृषी तज्ञांबरोबरच तसेच जनप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन), मा.राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन), प्रधान सचिव (कृषी व फलोत्पादन) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/ प्रादेशिक विभागांच्या कृषी संचालनालय बरोबरच फलोत्पादन विभागाच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे दिनांक २६ मे, २०१६ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यात कृषी शाश्वत विकासासाठी अनुक्रमे खरीप व रब्बी हंगामाकरिता विविध कल्याणकारी योजनांकरिता भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-१०-२०१६) :**(१) दिनांक २६ मे, २०१६ व त्यासुमारास असे कोणतेही लेखी निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२), (३) व (४) बाबत प्रश्नच उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर कृषी कार्यालयाला स्वत:च्या मालकीची इमारत बांधून देणेबाबत

**(३७) ५७३२६ (२०-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील २७ लाख शेतकऱ्यांसाठी शेकडो योजना राबविणाऱ्या आणि त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा विनियोग करणाऱ्या कृषी कार्यालयाला स्वत:चे कार्यालय (इमारत) नसल्याने भाड्याच्या जागेत कार्यालयाचा कारभार चालविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कोल्हापूर कृषी कार्यालयाला स्वत:च्या मालकीची इमारत बांधून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२५-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रादेशिक गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील जमीन कोल्हापूर जिल्हयाच्या कृषि भवनास देणेबाबत तपासणी करून त्याप्रमाणे जागा देणेबाबत निर्णय घेण्याचे शासनस्तरावरून निर्देश दिलेले आहेत. जागा उपलब्ध झाल्यानंतर कृषि भवन उभारण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगाराच्या बसेस दुरुस्त करण्याबाबत**

**(३८) ५८२८० (२४-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगाराच्या बसेसची दुरवस्था झाली असून नादुरुस्त झाल्या असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा आगारातून जवळपास ५२ बसेस रस्त्यावर धावत असून त्यामध्ये बहुसंख्य बसेस नादुरुस्त झाल्या असून प्रवाशांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे हेखरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील राज्य परिवहनमहामंडळाच्या आगाराच्या बसेस दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) महामंडळाच्या धोरणानुसार मंगळवेढा आगारातील वाहनांची देखभाल नियोजित कार्यक्रमानुसार करण्यात येते सदरच्या देखभाल कार्यक्रमानुसार राज्य परिवहन वाहनांची देखभाल ही प्रतिबंधात्मक देखभाल कार्यक्रमांर्तगत दैनिक दशदिनी देखभाल व त्रैमासिक डॉकींग करण्यात येते ज्या वाहनांची कामे आगार पातळीवर होणे शक्य नसते त्या वाहनांची कामे विभागीय कार्यशाळेत करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील एस.टी बसेसची सुधारणा करण्याबाबत**

**(३९) ५८५३६ (२४-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील बहुतांश एस.टी बसेस मोडकळीस आल्या असून बसेसच्या फाटलेल्या सीट्स, खिळखिळ्या झालेल्या खिडक्यांच्या काचा, फाटके पत्रे यासारख्या अनेक समस्यांनी एस.टी ला ग्रासले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवाशांना अशा अनेक असुविधांना सामोरे जावे लागत आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करुन सदर एस.टी बसेसची सुधारणा करण्याबाबत प्रवाशांना सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-१०-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) कोल्हापूर विभागातील प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याकरिता रा प बसेसची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येते तसेच कोल्हापूर विभागातील बसेसचा ताफा सक्षम राहण्याकरीता मागील तीन वर्षामध्ये ९६ वाहने मोडीत काढण्यात येवून १२० नविन वाहने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या काळात अनेक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४०) ५९००७ (२०-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नसीम बानो पटेल यांच्या काळात अनेक गैरव्यवहार झाल्याने त्यांना निलंबित करून त्यांनी घेतलेल्या निर्णयांची स्वतंत्र आयोग किंवा सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी मंडळाचे सदस्य जानीमियाँ यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मे, २०१६ वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी त्यांच्या अधिकार कक्षेचे उल्लंघन केले आहे किंवा कसे या विषयीच्या विविध तक्रारींची छाननी करण्यात येत आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील चार कृषी विद्यापिठातील एकूण सुमारे ३४ टक्के पदे रिक्त असल्याबाबत.**

**(४१) ५९२१८ (२०-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार कृषी विद्यापिठातील एकूण सुमारे ३४ टक्के पदे रिक्त असल्याची बाब माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त जागांमुळे विद्यापिठांच्या शैक्षणिक संशोधन आणि विस्तार विषयक कामात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासन आणि मा.राज्यपालांकडे सदर रिक्त जागा भरणेबाबत विद्यापिठांकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येऊनही सदर जागा भरण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) दि.०२.०७.२०१६ च्या पत्रान्वये ५० टक्के रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत चारही कृषी विद्यापीठांना निदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्हयात कृषी भवन उभारण्याबाबत**

**(४२) ५९४५७ (२०-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात कृषी भवन उभारण्याची घोषणा मा.पालकमंत्री कोल्हापूर महोदयांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर निर्णयावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२५-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील कृषि विभागाच्या कार्यालयासंबंधी एकत्रित माहिती येऊन ज्या कार्यालयांना शासकीय इमारत उपलब्ध नाही, अशा कार्यालयांना शासकीय इमारत उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्त (कृषि) यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रादेशिक गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील जमिन कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषि भवनास देणे बाबत तपासणी करुन त्याप्रमाणे जागा देणेबाबत निर्णय घेण्याचे शासनस्तरावरुन निर्देश दिलेले आहेत. जागा उपलब्ध झाल्यानंतर कृषि भवन उभारण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयाचे कृषिचे मुख्य कार्यालय असणारे कृषि अधिक्षक कार्यालयासह सर्व कृषि कार्यालये एकाच ठिकाणी येण्याबाबत**

**(४३) ५९७२३ (२०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयाचे कृषिचे मुख्य कार्यालय असणारे कृषि अधिक्षक कार्यालयासह करवीरमधील दोन उपविभागीय कार्यालये, तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी, माती परिक्षण प्रयोगशाळा व खतचाचणी प्रयोगशाळा भाडयाच्या घरात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयाच्या भाडयापोटी शासनाने सुमारे २५ कोटी रुपये खर्च येतो, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सर्व कृषि कार्यालये एकाच छताखाली येण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाने दोन वर्षापूर्वी प्रादेशिक गूळ संशोधन केंद्रानजिकची २ एकर जागेच्या मागणीचा प्रस्ताव तत्कालिन कृषिमंत्री यांच्याकडे सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) असल्यास, निर्णयाअंती जिल्हयातील सर्व कृषि कार्यालये एकाच ठिकाणी येण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२५-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. रुपये ५१,६५,७१९/- इतका खर्च वार्षिक भाडेपोटी येतो.

(३) होय.

(४), (५) व (६) महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रादेशिक गुळे संशोधन केंद्र, कोल्हापूर येथील जमिन कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषि भवनास देणे बाबत तपासणी करुन त्याप्रमाणे जागा देणेबाबत निर्णय घेण्याचे शासनस्तरावरुन निर्देश दिलेले आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर कृषि भवन उभारण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल

---

**राज्यातील शेतकरी सेवा सहकारी सोसायट्यांमधून औषधे व किटक नाशके विक्रीसाठी फार्मासिस्ट नेमण्याची अट घातल्याबाबत**

**(४४) ६००२५ (२०-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी सेवा सहकारी सोसायट्यांमधून औषधे व कीटकनाशके विक्रीसाठी तज्ञ फार्मासिस्ट नेमण्याची अट शासनाकडून नव्याने घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नव्या धोरणाच्या शेतक-यांच्या सेवा सहकारी सोसायट्यांच्या पदाधिका-यांनी विरोध केलेला असून अशा जाचक अटी रद्द करण्याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०८-२०१६) :**(१) होय.

कीटकनाशकांचे उत्पादन, विक्री, साठवणूक प्रदर्शित, वितरण करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दि.०५.११.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये कीटकनाशके (सुधारणा) नियम २०१५ प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये नियम १० उपनियम १ अ (१) मध्ये कीटकनाशक विक्री साठी विहीत अर्हतेविषयी तरतूद केली आहे. त्यानुषंगाने संचालक (निवगुनि) कृषी आयुक्तालय, पुणे यांनी दि.०८.१२.२०१५ रोजी तसे आदेश निर्गमित केलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे काय.
(३) याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने, मा.केंद्रीय कृषि मंत्री महोदयांना दिनांक ११/०१/२०१६ रोजी पत्र पाठवून कीटकनाशक परवाना धारकांसाठी लागू केलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबत पुर्नविचार करण्याबाबत विनंती केली हाती. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दि.१७.०८.२०१६ च्या अधिसुचनेन्वये कीटकनाशकाच्या विक्री साठा प्रदर्शन, वितरण इत्यादीकरिता नियमात विहित केलेल्या परवानाधारकांच्या शैक्षणिक अर्हतेत सुधारणा प्रस्तावित केली असून सदर शिथील शैक्षणिक अर्हता बाबतचे प्रारुप नियम जनतेच्या सुचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गेल्या वर्षाच्या खरिपातील शेतपिकांच्या नुकसानीपोटी शासनाने जाहिर केलेल्या दोन हजारकोटी रुपयांच्या मदतीचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत**

**(४५) ६०२०३ (२०-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेल्या वर्षाच्या खरिपातील शेतपिकांच्या नुकसानीपोटी शासनाने पहिल्या टप्प्यात दोन हजारकोटी रुपयांच्या मदतीचे वाटप जाहीर केले असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास या संदर्भात शासनाने विशेष मोहीम राबवून मदत वाटपाचा आढावा घेण्यासाठी संबधित जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणार आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समित्या स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासन निर्णय एससीवाय-१२/२०१५/प्र.क्र. १८७/म-११ दि.२.१.२०१६ अन्वये समिती स्थापन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयात आपत्ती अधिकारी हे पद भरण्यासंदर्भात

**(४६) ६०२५१ (२२-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा आपत्ती अधिकाऱ्यांनी मागील आठ महिन्यापूर्वी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आदि महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनेक इमारती जुन्या असून पावसाळ्यात उद्भणाऱ्या आपत्ती संदर्भात निर्णय घेण्याकरिता जिल्हा आपत्ती अधिकारी नसल्याने निर्माण होणाऱ्या समस्या दूर करण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे काय,
(३) असल्यास, चौकशीकरुन सदरचे जिल्हा आपत्ती अधिकारी हे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१६)** :(१) होय.
(२) जिल्हा आपत्ती व्यवस्थान अधिकारी या पदाचे महत्व विचारात घेऊन, या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.१८.०३.२०१६ च्या आदेशान्वये तहसिलदार (सर्वसाधारण) यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत देण्यात आला होता.
(३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे पद भरण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील चारही कृषी विद्यापीठांची स्थगिती उठविण्याबाबत

**(४७) ६०६४८ (२०-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांची शिक्षण, संशोधन तसेच विस्तारकार्य लक्ष्यपूर्तीच्या मूल्यांकनासाठी नेमलेल्या समितीने अहवालात उणिवा दर्शविल्यानेअधिस्वीकृती स्थगित करण्यात आल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अखिल भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून विद्यापीठांना मिळणारे अनुदान रखडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू चारही कृषी विद्यापीठांची स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) अधिस्विकृतीस दिलेली स्थगिती रद्द करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन मा.केंद्रिय कृषी मंत्री महोदयांना दि.०१.०७.२०१६ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

तसेच विविध संवर्गातील विशेषत: शिक्षकवर्गीय पदे रिक्त पदांच्या ५०% इतकी भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

नवीन खाजगी महाविद्यालय स्थापनेस मान्यता देण्यात येऊ नये, तसेच नवीन तुकडीवाढ करण्यात येऊ नये, असे विद्यापीठांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाची जबाबदारी साखर कारखाने व शासनाने उचलण्याबाबत

**(४८) ६०९९४ (२२-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुष्काळात होरपळलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जाची जबाबदारी साखर कारखाने व शासनाने जास्तीत जास्त उचलावी असे नवे धोरण अमलात आणण्याचा निर्णय मा. मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय, याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील कृषी विद्यापीठांना अनुदान देण्याबाबत

**(४९) ६१३०३ (२०-०८-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांची मान्यता भारतीय कृषी संशोधन परिषदेने, गेल्या महिन्यातच रद्द केल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कृषी विद्यापीठांची मान्यता रद्द होणार असल्याची किंवा मान्यता रद्द झाल्याची माहिती असुनही या विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना कळू दिले नाही, यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्याचे नुकसान होणार, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विद्यापीठांच्या मान्यता रद्द होऊ नये यासाठी तसेच शासनाने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२४-१०-२०१६) :**(१) भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने विद्यापीठांची मान्यता रद्द केलेली नसून अधिस्वीकृती (मानांकन) अहवालातील सूचनांनुसार कार्यवाही होईपर्यंत अधिस्वीकृती स्थगित ठेवली आहे.

(२) नाही.

भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने अधिस्वीकृतीसाठी दिलेली स्थगिती विद्यार्थीप्रवेशाशी निगडीत नाही. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींवर परिणाम होणार नाही.

(३) अधिस्विकृतीस दिलेली स्थगिती रद्द करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन मा.केंद्रिय कृषी मंत्री महोदयांना दि.०१.०७.२०१६ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

तसेच विविध संवर्गातील विशेषत: शिक्षकवर्गीय पदे रिक्त पदांच्या ५०% इतकी भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाच्या सुचनेनुसार कृषि परिषद, पुणे व सर्व कृषि विद्यापीठांनी आपला कृती अहवाल त्यांना सादर केला आहे.

शासनाकडून विद्यापीठास दरवर्षी अनुदान दिले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अचलपूर (जि.अमरावती) येथील कृषी महाविद्यालय कृषी संशोधन उपकेंद्र स्थापनेच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

**(५०) ६१७१८ (२०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथे कृषी संशोधन उपकेंद्र कृषी महाविद्यालय स्थापनेच्या प्रस्तावास आदिवासी उपयोजने अंतर्गत मंजुरी मिळणेबाबत स्थानिक विसस अचलपूर यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी लेखी पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सन २०११ पासून अनेक वेळा विधानसभेत पाठपुरावा करूनही सदर कृषी महाविद्यालय स्थापने कामी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कृषी महाविद्यालय स्थापनेबाबत तात्काळ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२५-१०-२०१६) :**(१) अचलपूर (जि.अमरावती) येथे कृषि संशोधन उपकेंद्र कृषि महाविद्यालय स्थापनेच्या प्रस्तावास आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूरी मिळणेबाबत स्थानिक वि.स.स. अचलपूर यांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये पत्रान्वये मागणी केली आहे हे खरे आहे,
(२) प्रत्येक जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. अमरावती जिल्ह्यात एक शासन अनुदानित कृषी महाविद्यालय कार्यरत आहे. अचलपूर येथे शासकीय कृषि महाविद्यालय स्थापनेचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडून प्राप्त झाला होता. प्रस्तुत प्रस्तावात कृषि संशोधन केंद्राच्या जमिनीवर कृषि महाविद्यालय उभारणे प्रस्तावित होते. सदर बाबीचा तेथील संशोधनावर काय परिणाम होईल याचा अभ्यास होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या पुनर्विलोकनार्थ परत पाठविण्यात आला आहे.
(३) अचलपूर, येथे कृषि महाविद्यालय स्थापनेची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.